स्थायी समिती
दाखल विषय – दि. २९/६/२०२१

विषय क्रमांक :– ४३९ त्वर्य

कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत राजीव गांधी हॉस्पिटल, येरवडा येथे लहान मुलांसाठी तयार करण्यात येणाऱ्या डेडीकेटेड पेडीएट्रिक कोविड हॉस्पिटलसाठी रॅम्प वाढविणे व वॉटरप्रुफिंगसह अंतर्गत विविध दुरुस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सचिन कांबळे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८७,४४,०७१=५० पेक्षा २१.४५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ६८,६८,४६८=१६ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,४९,२८८=५८ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ३०,९५०/– पर्यंत व टेंडर अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/२६२ दि.२४/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४४० त्वर्य

कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत राजीव गांधी हॉस्पिटल, येरवडा येथे लहान मुलांसाठी तयार करण्यात येणाऱ्या डेडीकेटेड पेडीएट्रीक कोविड हॉस्पिटलसाठी पेंटींग व बाहेरील प्लंबिंगसह अंतर्गत विविध दुरुस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रोहित कंन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८९,०१,६७५=४० पेक्षा २५.९३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ६५,९३,४७०=९६ पर्यंत कामे करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,६८,२०१=०५ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये २१,१२३=५५ पर्यंत अधिक अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/२६३ दि.२४/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४४१ त्वर्य

कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत राजीव गांधी हॉस्पिटल, येरवडा येथे लहान मुलांसाठी तयार करण्यात येणाऱ्या डेडीकेटेड पेडीएट्रीक कोविड हॉस्पिटलसाठी फर्निचर व कॉंक्रीटची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रोहित कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,३६,९०५/– पेक्षा २६.९६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २८,७५,५१५=४१ उपलब्ध तरतुदी रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ४,७२,४२८=६० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ४६,६६६=४० अधिक निविदा अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/२६५ दि.२८/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४४२ त्वर्य

मा.जिल्हाधिकारी पुणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पुणे यांनी निर्देशीत केलेल्या किरकोळ व्यापारी/घाऊक व्यापारी यांचेकडून खरेदी केलेली रेमडिसिव्हिर इंजेक्शन करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) (क) अन्वये र.रु. २ कोटी पर्यंत झालेल्या खर्चाच्या बिलाची रक्कम अदा करणेत येणार असून सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२६६ दि.२८/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४४३ त्वर्य

रामटेकडी व वानवडी प्रभागात टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार एन.वाय.शिवरकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,९९,६७०/– पेक्षा १.०००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २९,६९,६७३=३० पर्यंत काम करून घेणेसाठी व त्यांचेशी करारनामा करणेस व 'ब' पाकीट उघडल्यापासून काम सुरु करणेस पश्चात मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/२६७ दि. २८/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४४४ त्वर्य

ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यांवर पाणीपुरवठा वाहिनी/मलनि:सारण वाहिनी/गॅस वाहिनी/वीज वाहिनी तसेच केबल खोदाईचे रिईनस्टेटमेंट करणे तसेच इतर व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८७,९९,४५०=२५ पेक्षा ३७.९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५४,६४,४५८=६१ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,५५,९३४=०३ पर्यंत अधिक रॉयल्टी र.रुपये ९,३७०=४० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ३,२५०/– पर्यंत त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२६८ दि.२९/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४४५ त्वर्य

वानवडी रामटेकडी क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांवरील चेंबर्स समपातळीत करणे, आर.सी.सी. चेंबर्स करणे, क्षेत्रिय कार्यालयनिहाय मोबाईल मेंटेनन्स युनिटद्वारे देखभाल दुरुस्ती विषयक व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६६,०७,६७८=५० पेक्षा ३६.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४१,६३,४९८=२२ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ७,९२,९२१=४२ पर्यंत अधिक लेबरसेस ६६,०७६=७९ पर्यंत अधिक वर्करइंश्युरन्स र.रु. ३३,०३८=३९ पर्यंत अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२६९ दि.२९/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४४६ त्वर्य

धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील रस्त्यांवरील चेंबर्स समपातळीत करणे, आर.सी.सी. चेंबर्स करणे, क्षेत्रिय कार्यालयनिहाय मोबाईल मेन्टनंस युनिटद्वारे देखभाल तद्नुषंगिक इतर कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शुंभम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६६,०५,९९४=५० पेक्षा ३२.८६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४४,३५,२६४=७१ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ७,९२,७१९=३४ पर्यंत अधिक लेबरसेस र.रुपये ६६,०५९=९५ पर्यंत अधिक वर्करइंश्युरन्स र.रु. ३३,०२९=९७ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये २,१६२=४० पर्यंत अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२७१ दि.२९/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४४७ त्वर्य

प्रभाग क्र. ३५ कै.पंडित भिमसेन जोशी कलादालन येथे विविध दुरुस्ती विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.वेंकटेश्वरा डेव्हलपर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४४,६४,२७८=५० पेक्षा १८.१८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३६,५२,६७२=६६ उपलब्ध तरतुदी रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,३५,७१३=४२ अधिक निविदा अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/२७२ दि.२९/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४४८ त्वर्य

पुणे शहरातील नदीमधील जलपर्णी स्पायडर मशीनच्या सहाय्याने काढणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.अंकिता इंजिनिअर्स यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.९८,४०,५९०/– पेक्षा ९.५०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८९,०५,७३३=९५ पर्यंत होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/२७४ दि.२९/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४४९ त्वर्य

पुणे शहरातील तलावामधील जलपर्णी स्पायडर मशीनच्या सहाय्याने काढणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोरया डेव्हलपर्स यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,९९,७६०=५० पेक्षा ०.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४९,५०,२६२=८७ पर्यंत होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/२७५ दि.२९/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४५० त्वर्य

पाणीपुरवठा विभागाकडील उत्पन्न वाढीसाठी खालील धोरणानुसार अभय योजना (Amnesty scheme) राबविणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पापु/२७७ दि.२९/६/२०२१ चे पत्र.

१) ही अभय योजना फक्त निवासी व व्यापारी आस्थापनांनी घेतलेल्या अनधिकृत नळजोडांसाठीच लागु राहील.
२) ही योजना फक्त तीन महिन्यांसाठीच लागु राहील.
३) ही योजना फक्त १ जून२०२१ पुर्वी अस्तित्वात असलेल्या अनधिकृत नळजोडांकरीताच लागू राहील. या नंतर घेण्यात आलेल्या सर्व अनधिकृत नळजोडांवर कारवाई करण्यात येईल.
४) योजना जाहीर झाल्यानंतर तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये नागरीकांनी अर्ज दाखल करावयाचा आहे. अर्ज दाखल करणाऱ्यांनी म.न.पा.च्या पाणीपुरवठा विभागाच्या संबंधित झोनच्या (स्वारगेट/सावरकर भवन/ एसएनडीटी/ चतु:श्रृंगी/बंडगार्डन/लष्कर) कार्यकारी अभियंत्यांकडे साध्या कागदावर अर्ज करावयाचा आहे. त्या अर्जामध्ये अभय योजनेसाठी अर्ज दाखल करत असल्याचे नमुद करावयाचे आहे. अर्जामध्ये नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक नमुद करायचा असुन, अर्जासोबत एम.एस.ई.बी. किंवा टेलीफोनचे बिल, आधारकार्डाची प्रत, मालकी हक्काची कागदपत्रे जोडावयाची आहे.
५) अर्ज प्राप्त झाल्यानंतर पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्यांकडुन जागा पाहणी करण्यात येईल. एकुण अस्तित्वातील टेनामेंट्सच्या अनुषंगाने नियमानुसार अनुज्ञेय असलेले नळजोडच नियमान्वित करण्याकरीता पात्र राहतील. इतर सर्व अनधिकृत नळजोडांवर कारवाई करण्यात येईल.
६) एक इंच व्यासापेक्षा अधिक व्यासाचे नळजोड नियमान्वित करण्यात येणार नाहीत.
७) प्रत्येक नियमित करण्यात येणाऱ्या अनधिकृत नळजोडासाठी त्याच्या व्यासाप्रमाणे खालील प्रमाणे शुल्क आकारण्यात येईल.

| अ.क्र. | अनधिकृत नळजोडाचा व्यास (इंचामध्ये) | दंडासहित नळजोड शुल्क रक्कम रुपये | |
|---|---|---|---|
| | | निवासी नळजोड | व्यापारी नळजोड |
| १ | १/२ | ४,०००.०० | ८,०००.०० |
| २ | ३/४ | ७,५००.०० | १५,०००.०० |
| ३ | १ | १९,५००.०० | ३५,५००.०० |

८) सदरच्या शुल्कानुसार अर्जदाराने संपुर्ण रक्कम भरल्यानंतर पाणी पुरवठा खात्यामार्फत प्रत्येक नियमित केलेल्या नळजोडाला नि:शुल्क पध्दतीने AMR मीटर बसविण्यात येतील.

नळजोड अधिकृत करुन घेण्यासाठी आवश्यक ते शुल्क (दंडासहित) पुणे मनपाकडे जमा केल्यानंतर, यापुर्वी अनधिकृतरित्या घेण्यात आलेले नळजोड नियमित असल्याचे समजण्यात येईल.

९) पाणीपुरवठा अभय योजनेमध्ये चाळ विभाग, अनधिकृत झोपडपट्टी, गावठाण, गुंठेवारीनुसार केलेली घरे यांचाही समावेश करणेस

विषय क्रमांक :– ४५१ त्वर्य

मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेत्या यांचे दि. २४/६/२०२१ चे पत्र.

शहरात मार्च २०२० पासून कोरोनाची लाट आहे. कोरोनामुळे संचारबंदी करण्यात आली होती.मागील वर्षी मार्च ते सप्टेंबर तर चालु वर्ष (२०२१-२२) एप्रिल आणि मे दोन्ही महिने संपुर्णता लॉकडाउन होता. आजही परिस्थिती पुर्व पदावर नाही. या कालावधित अत्यावश्यक सेवा वगळता सर्वच व्यव्हार ठप्प होते. प्रामुख्याने महानगरपालिकेकडील पथारी व्यवसायिक, महापालिकेने भाडेतत्वार दिलेले गाळे धारक, पार्किंग, क्रिडा संकुल व जलतरण तलाव हे देखील या कालावधित बंद होते. असे असताना महापालिकेने वाढीव दराने भाडे/शुल्क आकारणी या नोटीसेस बजावल्या आहेत. ह्या हातावर पोट असलेल्या व्यवसायिकांवर अन्याय आहे. यामुळे महापालिकेने यांचे मार्च २०२० ते मे २०२१ पर्यंतचे भाडे/शुल्क माफ करावे. तसेच भाडे दरवाढ रद्द करावी.

विषय क्रमांक :– ४५२ त्वर्य

मा.सुनिल टिंगरे, आमदार, मा.सौ.शेख फरजाना अय्युब व मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेत्या यांचे दि. २५/६/२०२१ चे पत्र.

पुणे महानगरपालिका हद्दीत नवीन गावे समाविष्ट झाल्यापासून आजतागायत जुन्या हद्दीच्या तुलनेत नवीन हद्दीत समाविष्ट परिसरचा अतिशय अल्प प्रमाणात विकास झालेला आहे. विकासाचा मोठा अनुशेष नवीन हद्दीत निर्माण झालेला आहे. पुणे मनपा रस्ते,पाणी,ड्रेनेज, आरोग्य इत्यादी मुलभुत सुविधा देखील समाविष्ट परिसरासाठी उपलब्ध करून देऊ शकली नाही. प्रचलित नियमावलीनुसार पहिले ६ वर्षाने टप्प्याटप्प्याने कर आकारणी वाढविणे व नंतर प्रचलित दराने कर आकारणी करणे योग्य आहे परंतु चार वर्ष हद्दीत येऊन झाल्यावर देखील किमान मुलभुत सुविधा मनपा देऊ शकत नसेल तर मनपा दराने कर आकारणी करण्याची गरज नाही.

जोपर्यंत जुन्या हद्दीच्या परिसराच्या तुलनेत नवीन हद्दीत मुलभुत सोयी सुविधा उपलब्ध मनपा करून देत नाही तोपर्यंत जुन्या ग्रामपंचायत दराने कर आकारणी करण्यात यावी.

विषय क्रमांक :– ४५३ त्वर्य

मा.सौ.मनिषा कदम व मा.सौ.वर्षा तापकीर यांचे दि. २९/६/२०२१ चे पत्र.

कात्रज–कोंढवा रोड विकास प्रतिष्ठान ही रजिस्टर्ड संस्था असून कात्रज परिसरातील नागरिकांसाठी विविध सामाजिक, शैक्षणिक, क्रिडा व आरोग्य विषयक उपक्रम संस्थेमार्फत राबविले जातात व त्याचा अनेक गोरगरीब व गरजु नागरिकांना लाभ होतो. या परिसरात पॅथॉलॉजी लॅब, ब्लड बँक, आरोग्य विषयक विविध तपासणी, सिटी स्कॅन, एम.आर.आय. या सुविधांकरीता नागरिकांना खाजगी रुग्णालयात जावे लागते व तेथे मोठया प्रमाणात खर्च करावा लागतो.

कात्रज–कोंढवा रोड विकास प्रतिष्ठान ही संस्था सदर आरोग्य सुविधा माफक व सर्वांना परवडतील अशा दरात करण्यास तयार असुन त्यासाठी त्यांना जागेची आवश्यकता आहे.

तरी पुणे महानगरपालिकेची कात्रज स.नं. २२, निलया सोसायटी शेजारी पुणे महानगरपालिकेची तीन मजली बहुउद्देशीय इमारतीतील तळमजला विविध आरोग्य विषयक उपक्रम राबविण्यासाठी कात्रज–कोंढवा रोड विकास प्रतिष्ठान या संस्थेस नाममात्र दरात ३० वर्षे कराराने देण्यास मान्यता द्यावी

विषय क्रमांक :– ४५४ त्वर्य

मा.राहूल भंडारे व मा.विशाल धनवडे यांचे दि. २९/६/२०२१ चे पत्र.

जूनसेवा स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादित, १३० दांडेकर पूल, पुणे ३० रजि. नं. पीएनए/पीएनए/(४)/जीएनएल/(ओ) ५१०२/२०२०–२०२१ दि. ३१/३/२०२१ ही संस्था महाराष्ट्र अधिनियम १९६० मधील (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२४)कलम ९(१) अन्वये नोंदणीकृत झालेले आहे. शासन निर्णय क्रं. – रोस्वरो–२००२/प्र.क्र.२६७ रोस्वरो–१ अन्वये बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना विना निविदा कामे देणेबाबत निर्णय झालेला आहे.

तरी सदर शासन निर्णयानुसार जूनसेवा स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादित, १३० दांडेकर पूल, पुणे ३० या संस्थेस पुणे महानगरपालिकेची कामे र.रू.३ लाखपर्यंत विना निविदा देण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– ४५५ त्वर्य

मा.महेश वाबळे व मा. राहूल भंडारे यांचे दि. २९/६/२०२१ चे पत्र.

कोंढवा खुर्द मिठानगर मधील सिव्हीक कल्चर व कम्युनिटी सेंटरचे अर्धवट काम पूर्ण करणेबाबत संदर्भ क्र. १ च्या अन्वये बैठक झाली असता सदर बैठकीमध्ये हज हाऊस ऐवजी सिव्हीक कल्चर सेंटर ॲन्ड सोशल सर्व्हिस या नावाने इमारत बांधावी तसेच सदर इमारत बांधून पुर्ण झाल्यानंतर या इमारतीचा वापर हज हाऊस म्हणून करण्याबाबतचे मिनिट्स प्राप्त झाले असून त्यावरुन असे दिसून येते की, राज्य शासनाचे धार्मिक स्थळाबाबतचे असलेले आदेश पाहता सदरचा प्रस्ताव मा.मुख्य सभेमार्फत राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा.

तरी जो पर्यंत राज्य शासनाची मान्यता होत नाही तो पर्यंत मा.स्थायी समिती ठराव क्र. ४८३ दि. २२/६/२०२१ दप्तरी दाखल करण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– ४५६ त्वर्य
मा.महेश वाबळे व मा.राहूल भंडारे यांचे दि. २९/६/२०२१ चे पत्र.

महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत पुणे महानगरपालिकेचे कमला नेहरू रूग्णालय, डॉ.नायडु रूग्णालय, सीओईपी जम्बो कोविड सेंटर व बाणेर जंबो कोविड सेंटर हे अंतर्भूत करण्यात आले असून सदर रुग्णालयात शासन निर्णयामधील तरतुदी व मार्गदर्शक सूचनानुसार सदर योजने अंतर्गत करण्यात येणाऱ्या रुग्णोपचाराच्या अनुषंगाने विमा माध्यमातून निधी प्राप्त होणार असून त्याचा विनियोग करणेकरीता मा. स्थायी समिती ठराव क्र. १६४ दि. २७/४/२०२१ अन्वये मान्यता प्राप्त झालेली असून सदर ठरावातील मुद्दा क्र. ५ मध्ये नमुद केलेल्या समितीमधील अ.क्र. ८ येथे लेखा परिक्षक, मुख्य लेखा परिक्षक कार्यालय यांची सदर समितीमध्ये सदस्य नियुक्ती करणेस मान्यता मिळालेली आहे परंतू सदर कामी मुख्य लेखा परिक्षक यांचे ऐवजी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पुणे महानगरपालिका यांची नियुक्ती करणे उचित होणार आहे.

तरी मा. स्थायी समिती ठराव क्र. १६४ दि. २७/४/२०२१ मधील मुद्दा क्र. ५ येथील अ.क्र. ८ येथे मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पुणे महानगरपालिका यांची सदस्य म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देण्यात यावी.

शिवाजी दौंडकर
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.